


श्री गुरू गौतम मुनी मेडिकल अ‍ॅण्ड चॅरिटेबल सेंटर, अरण्येश्वर

जीवनयात्रींचा

# जीवनदात्री


मानव सेवा

माफक दर - अचूक निदान

# हेतू काय?



आरोग्य हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे, असं आपलं संविधान सांगतं. तरीही भारतातील कित्येक लोकांना आरोग्याच्या मूलभूत सुविधा मिळवणेही अशक्य कोटीतील गोष्ट वाटते. आपल्या आजूबाजूचा समाज दुर्धर आजाराने ग्रस्त असताना केवळ पैशाअभावी त्यांच्या उपचारांची हेळसांड होते, हे कुणाही संवेदनशील माणसाला खटकण्यासारखं आहे. म्हणूनच श्री गुरू गौतम मुनींच्या प्रेरणेतून पुण्यात 'श्री गुरू गौतम मुनी चॅरिटेबल ट्रस्ट' या नावाने एक संस्था सुरू झाली. मध्यमवर्गीय आणि गरीब लोकांना कमीत कमी खर्चात आरोग्यसेवा उपलब्ध करून देणं, हा या संस्थेचा मुख्य हेतू.



# मध्यमवर्गीय आणि गरिबांपर्यंत आता उत्तम उपचार



डायलिसीससारख्या खर्चिक उपचारांना मध्यमवर्गीय आणि गरिबांपर्यंत घेऊन जाण्यासाठी या संस्थेनं अविरत काम करण्याची शपथ घेतली. एक डायलिसीस करायला तीन हजार रुपये खर्च येतो आणि आठवड्यातून असे तीन डायलिसीस एका रुग्णाला करावे लागतात. म्हणजे एका आठवड्याचे साधारण ९ हजार रुपये. हे कोणत्याही सर्वसामान्यासाठी न सुटणारं आर्थिक कोडं होऊन बसतं. शिवाय त्यांना दरवेळी रक्तवाढीसाठी इंजेक्शनं घ्यावी लागतात. एक इंजेक्शन ७०० रुपयांना असतं आणि अशी आठवड्यातून तीन इंजेक्शनं म्हणजे आणखी दोन हजार. असे जवळपास ४५-५०हजार रुपये एका पेशंट मागे खर्च होतात. गरीब किंवा मध्यमवर्गीय कुटुंबाना हा खर्च न पेलण्यासारखा आहे. या आजारातून रुग्ण कधीच पूर्णतः बरा होत नाही आणि जिवंत असेपर्यंत त्याला या दिव्यातून जावंच लागतं. अशावेळी कुटुंबावर खूप मोठा आर्थिक ताण येतो. आपण बरे तर होणार नाही उलट दिवसेंदिवस आपण आपल्याच कुटुंबीयावर एक ओझं बनून जगत आहोत, या विचारानं हे रुग्ण आत्महत्येकडे वळतात. समाजातील ही विदारक परिस्थितीपाहून ‘श्री गुरू गौतम मुनी’ यांच्या नावाने पुणे येथे सुरू असलेल्या या ट्रस्टने अत्यल्प दरात डायलिसीसची सेवा देण्यास सुरुवात केली.

इतर ठिकाणी डायलिसीससाठी २५०० ते ३००० रुपये इतकी किंमत मोजावी लागत असली तरी, इथं मात्र फक्त ३०० रुपये इतक्या कमी खर्चात डायलिसीस होऊन जाते. गेल्या ८ वर्षात संस्थेमार्फत आत्तापर्यंत ५० हजार डायलिसीस केले आहेत. म्हणजे आजवर समाजाचे १० कोटी रुपये संस्थेच्या कार्यामुळे वाचले आहेत.

# अविरतकाम

संस्थेचे हे काम अविरतपणे सुरू राहावे, कोणाच्या असण्या-नसण्याने संस्थेच्या कामावर काहीही परिणाम होऊ नये म्हणून संस्थेच्या विश्वस्तांनी, आपली संस्था आपल्या पायावर कशी उभी राहील यासाठी प्रयत्न सुरू केले. यावर उपाय म्हणून डायग्नॉस्टिक सेंटरची कल्पना लढवण्यात आली आणि संस्थेने स्वतःचे डायग्नॉस्टिक सेंटर सुरू केले. अगदी अत्यल्प दरात नागरिकांना आरोग्य सेवा द्यायच्या. या हेतूने हा उप्रकम सुरू करण्यात आला. इथल्या डायग्नॉस्टिक सेंटरमध्ये एक्स रे फक्त २०० रुपयात करून दिला जातो. ५०० रुपयात सोनोग्राफी केली जाते. कालांतराने संस्थेने डेंटल हेल्थ सेवा सुरू केली यात १५०० रुपयात रूट कॅनल केले जाते. तपासणीचे फक्त ५० रुपये घेतले जातात.

संस्थेने नुकतीच डायग्नोपिन पॅथॉलॉजी लॅब सुरू केली असून जिथे रक्त-लघवी तपासण्या बाहेरच्यापेक्षा १/३ दराने केल्या जातात. इतरत्र या उपचारांसाठी येणाऱ्या खर्चाची चौकशी केली तर, एक्सरेसाठी ५०० रुपये, सोनोग्राफीसाठी १०००-१५०० रुपये किंवा त्यापेक्षा जास्त, कन्सल्टिंग फी ५०० च्या घरात आहे. त्यामुळे इथल्या माफक दरातील सुविधांचा मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबातील लोकांना चांगलाच फायदा होऊ शकतो.



# कॅन्सरशी लढणारा भारत

सध्या भारतात कॅन्सरचे प्रमाण वाढत आहे. कॅन्सरया आजारावर आता केमोथेरपीसारखे आधुनिक उपचार निघाले आहेत, ज्यामुळे कॅन्सर पूर्णतः बरा होऊ शकतो; पण केमोथेरपीसाठी येणाऱ्या खर्चाचा आकडा पाहूनच गरीब आणि मध्यमवर्गीयांची भंबेरी उडते. म्हणून संस्थेने आता अत्यल्प वाजवी दरात केमोथेरपी सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. कारण, ऑपरेशनकरून कॅन्सरची गाठ काढली तरी तो पुन्हा बळावण्याची शक्यता असते. कॅन्सर बरा होणारा आजार असला तरी त्याचा खर्च जास्त असल्याने मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबे कॅन्सरच्या नावानेच हातपाय गाळतात. सर्वसामान्यांना परवडेल अशा दरात केमोथेरपी सुरू करण्याचा संस्थेचा मानस आहे. पुढील पाच वर्षांत घरटी एक माणूस कॅन्सरग्रस्त असू शकेल. त्यामुळंच याची गरज सध्या सर्वाधिक आहे.

घरातील एक जरी व्यक्ती किरकोळ आजारी पडली तरी एक दोन दिवसासाठी घराचं सगळं रुटीन विस्कळीत होतं, मग ज्यांच्या कुटुंबात कॅन्सरसारख्या दुर्धर आजाराने ग्रस्त पेशंट असतील त्यांची अवस्था काय होत असेल? यासाठी कराव्या लागणाऱ्या उपचारांचा खर्चही लाखाच्या घरात आहे. मग ही सेवा जर आपण ट्रस्टच्या माध्यमातून उपलब्ध करून दिली तरी आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गाला याचा नक्की फायदा होईल, अशा विचाराने संस्थने आता केमोथेरपी विभाग सुरू केला आहे.

यासाठी पुण्यातील मोठमोठ्या डॉक्टर्सना इथे तासिका तत्वावर बोलवून अल्प मानधनात त्यांची सेवा गरिबांसाठी उपलब्ध करूनदेण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. केमोथेरपीसारख्या उपचाराअभावी कोणाही व्यक्तीला जीव गमवावा लागणार नाही, अशी संस्थेला आशा आहे.

# दर्जेदार इलाजाची हमी

समाजातील गरीब आणि मध्यमवर्गीय लोकांसाठी माफक दरात आरोग्यसेवा देणे हा ट्रस्टचा मुख्य उद्देश आहे. कारण, या वर्गाला दर्जेदार पणमहागड्या आरोग्य सेवा विकत घेण्याची ऐपत नाही आणि येत्या काळात आरोग्याचे प्रश्न अधिकाधिक जटील होत जाणार आहेत. देसाई ट्रस्ट ही नेत्ररोग क्षेत्रात आरोग्य सुविधा देणारी एक मोठी संस्था आहे. त्यांच्याकडे वर्षाला हजारो, मोतीबिंदू व काचबिंदूचे ऑपरेशन्स केले जातात. दरवर्षी किमान पन्नास हजार शस्त्रक्रिया या ट्रस्टच्या वतीने केल्या जातात. या संस्थेशी टायअप करून आपल्या संस्थेतील रुग्णांवर त्यांच्याकडून उपचार करवून घ्यायचे, अशीही संस्थेची एक नवी योजना आहे. डोळ्यांची तपासणी, चष्मा, औषधे अशा इतरही सोयी उपलब्ध करून द्यायच्या आहेत. ज्यामुळे गरीब आणि मध्यमवर्गीयांना कमी खर्चात चांगल्या आणि दर्जेदार इलाजाची हमी मिळेल.

हल्ली अपघातांचं प्रमाण वाढलं आहे. अपघातामुळे अनेक व्यक्तींना अपंगत्व येतं किंवा येण्याची शक्यता असते. अशा लोकांना फिजिओथेरपिस्टची गरज लागते. फिजिओथेरपिस्टदेखील एकावेळी ५००-१००० रुपयांच्या खाली फी घेत नाहीत. मग ज्या लोकांना फिजिओथेरपिस्टची ट्रिटमेंट परवडत नाही त्यांनी काय करायचं? तसच अपंगत्व घेऊन जगायचं का? नाही. त्यांच्यासाठीही संस्थेने अत्यल्प दरात फिजिओथेरपी ट्रिटमेंट उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. फक्त १००-१५० रुपये इतक्या कमी दरात संस्था फिजिओथेरपीची सुविधा देणार आहे. यासाठी आवश्यक ती अत्याधुनिक साधन सामग्रीची सोयही संस्थेने केली आहे. एक फिजिओथेरपिस्ट ही संस्थेकडे सध्या उपलब्ध आहेत.

संस्थेने विविध प्रकारचे कन्सल्टिंग विभाग सुरू केलेत. कार्डिॲक, फिजिशियन, गायनॅक असे विविध प्रकारचे कन्सल्टंट येऊन इथे कमी दरात आपली सेवा देतात. इतरत्र लोकांना फक्त कन्सल्टिंगसाठी ४००-५०० रुपये मोजावे लागतात इथे फक्त १००-१५० रुपयात कन्सल्टिंग केले जाणार आहे.

काही क्रोनिक डिसीजवर होमिओपॅथिक औषधे सुद्धा काम करतात, तर एक होमिओपॅथिक कन्सल्टंटसुद्धा इथे उपलब्ध असेल.

# दुर्धर त्वचारोगही होतो बरा

सध्याच्या काळात बळावलेला आणखी एक आजार म्हणजे त्वचारोग. खाण्यापिण्याच्या बदलेल्या सवयी आणि वाढते प्रदूषण यामुळे ही समस्या येत्या काळात आणखी वाढू शकते. यात सोरायसिससारखे गंभीर आजारही आहेत. या आजारावर घेतल्या जाणाऱ्या औषधांमुळे दुष्परिणाम होण्याचीही शक्यता आहे. त्यातून आरोग्याची गुंतागुंत आणखी वाढू शकते. जळगावमध्ये एका शेतकऱ्याने सोरायसिसवर एक मलम शोधून काढली आहे. ज्यामुळे अगदी २०-२० वर्षांपूर्वीचे जुने सोरायसिसही पूर्णतः बरे झाले असल्याचा संस्थेचा अनुभव आहे. ॲलर्जिक त्वचा रोग, अंग खाजवणे, यावरही हे मलम खूप उपयुक्त आहे. भारतात असेही लोक आहेत ज्यांचं अस्सल देशी संशोधन लोकांपर्यंत पोहोचणं गरजेचं आहे. अशा उपयुक्त औषधासोबतच इतरही औषधे आणि उपचार उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. संस्थेने दिलेल्या कोड सारखे दुर्धर त्वचारोगही या व्यक्तीच्या औषधाने बरे होत आहेत. याबद्दल लोकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी संस्था काम करणार आहे.



# अवघे धरू सुपंथ

'श्री गुरू गौतम मुनी मेडिकल ॲण्ड चॅरिटेबल सेंटर' या संस्थेने स्वतःच्या डायलिसीस सेंटर बरोबर अनेकांना असे डायलिसीस सेंटर चालवण्यास प्रेरणा दिलेली आहे आणि त्यासाठी आवश्यक ती मदतही केलेली आहे.

पुण्यात २०१९ मध्ये मोठा पूर आला होता. त्यावेळी संस्थेने १० दिवस ३००० लोकांना सकाळ-संध्याकाळचं जेवण पुरवलं. काही लोकांचे संसार या पुरात वाहून गेले त्यांना भांडीकुंडी दिली कुणाला रेशन दिलं.

कोरोनाकाळात फुटपाथवर राहणाऱ्या बेघर लोकांना कुणीही वाली उरला नव्हता. घरातून बाहेर पडलं तरी पोलीस मारत होते. त्या काळात पुण्यातील अशा २५०० लोकांना जवळजवळ १०० दिवस संस्थेने जेवण पुरवलं. यात 'वंदे मातरम् संघटने'च्या कार्यकर्त्यांच्यामार्फत हे अन्न संपूर्ण पुणे शहरात पोहोचवलं गेलं. हे अन्न पोहोचवण्यासाठी या संघटनेच्या तरुणांनी पुढाकार घेतला म्हणून हे शक्य झालं. शिवाय त्याकाळात रस्त्यावरील भटकी कुत्री आणि गायी यांचीही अवस्था खूप बिकट झाली होती त्यांच्यासाठीही संस्थेने भाकरी देण्याची सोय केली. एका मावशींना भाकरी थापण्याचं काम दिलं होतं. संस्थेच्या या कामामुळं त्यांचाही संसार सुरळीत चालण्यास हातभार लागला.

कोरोना काळात ऑक्सिजन अभावी अनेक रुग्णांनी आपले प्राण गमावले; पण पुण्यात जेव्हा पहिल्यांदा ही परिस्थिती निर्माण झाली तेव्हा संस्थेने ताबडतोब कॉन्सन्ट्रेटेड ऑक्सिजन मशिन्स उपलब्ध करून दिले. एका तासात ७५ मशिन्स गोळा करून ती आवश्यक त्या ठिकाणी पोहोचवण्यात संस्थेने पुढाकार घेतला. यामुळे पुण्यात कित्येकांचे प्राण वाचले असतील, याचा अंदाजही करता येणार नाही.



# पूरग्रस्तांना मदत




२०२० मध्ये चिपळूणमध्ये आलेल्या महापुराने सर्वत्र हाहाकार उडाला होता. कित्येक लोकांची घरे आणि कष्टाने उभे केलेले संसार वाहून गेले. शाळा, दवाखाने सगळं काही उद्ध्वस्त झालं. त्यावेळी संस्था पुन्हा एकदा या पूरग्रस्तांच्या मदतीला धावून गेली. चिपळूणमधील १५०० कुटुंबाना संस्थेच्या वतीने संसारोपयोगी वस्तू भेट देण्यात आल्या. यात अगदी पोळपाट पासून ताट, वाटी, तवा, पेले, चमचे अशा सगळ्या वस्तूंचा समावेश होता. १५०० पैकी प्रत्येक घरात यातील प्रत्येक वस्तू पोहोचेल याची खात्री करूनच संस्थेने हे काम यशस्वीपणे पार पाडले. नंतर समजले की इथल्या विद्यार्थ्यांकडे शालेय साहित्य उरलेलं नाही, त्यावेळी संस्थेने तिथल्या मुलांसाठी वही, दप्तर, पेनपासून ज्या काही वस्तू या मुलांना लागणार होत्या त्या सर्व उपलब्ध करून दिल्या. यासाठी संस्थेने पुण्याच्या भोसरी एमआयडीसीतील काही उद्योगपतींची मदत घेतली. दिल्लीच्या जैन कॉन्फरन्स या संस्थेनेही उत्स्फूर्त मदत केली. अशी सगळी मिळून एकूण २० लाख रुपयांची मदत संस्थेच्या वतीने चिपळूण मधील पूरग्रस्तांना पोहोचवण्यात आली. समाज कार्याचा वसा पुढच्या पिढीला द्यायचा असेल तर तो अनुकरणातूनच द्यायला हवा. यासाठी चिपळूणमधील पूरग्रस्तांना मदत करताना, त्यासाठीचे कीट बनवणे, वस्तू गोळा करणे, त्या तिथं पर्यंत नेऊन त्यांचं योग्य प्रमाणात वाटप करणे ही सगळी जबाबदारी संस्थेने तरूण पिढीवर सोपवली. संस्थेच्या वतीने केले जाणारे हे काम पुढच्या पिढीपर्यंत पोहोचावे म्हणून त्यांना यात सामील करून घेण्यात आले. वर्षातून पाच-दहा मेडिकल कॅम्प तरी संस्थेमार्फत चालवले जातात.

# आदिशक्ती पुरस्कार



नवरात्रीच्या दिवसात समाजासाठी काम करणाऱ्या महिलेला स्व. सौ. प्रतिभा संतोष भुरट यांच्या स्मृती प्रीत्यर्थ 'आदिशक्ती पुरस्कार' देऊन गौरवण्यात येते. गेल्या वर्षीपासून म्हणजे २०२२ पासून संस्थेने हा नवा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

# होईल तितका खर्च वाचवा

इतका मोठा पसारा सांभाळताना आर्थिक ओढाताण तर होणारच म्हणून प्रत्येक गोष्टीत होता होईल तितका खर्च वाचवणे हा संस्थेचा एक अलिखित नियम आहे; परंतु अशी काटकसर करताना गुणवत्तेशी तडजोड होणार नाही हेही पहिले जाते. ट्रस्टसाठी म्हणून औषधे, उपकरणे खरेदी करताना बरेचदा कमीदरात मिळतात. त्याचाही संस्थेला फायदा होतो. वीजबचत, पाणी बचत अशा मार्गाने वायफळ खर्चावर संस्थेने वचक ठेवला आहे.

केमोथेरपीपासून पॅथॉलॉजीपर्यंत आता संस्थेकडे बऱ्यापैकी आरोग्य सुविधा उपलब्ध आहेत. त्यासाठी लागणारी अत्याधुनिक उपकरणेही संस्थेकडे उपलब्ध आहेत.

# सेवेची अखंड ज्योत तेवतच राहणार...

उतू नको मातू नको, घेतला वसा टाकू नको, या उक्तीप्रमाणे येणाऱ्या काळातही याच निस्वार्थ भावनेने संस्था काम करीत राहील. नवी पिढीही या कार्याला समजून घेऊन त्यांचे योगदान देईल, अशी अपेक्षा आहे. खरं तर अत्यल्प दरात रुग्णांना आरोग्य सुविधा देणाऱ्या या संस्थेबद्दल लोकांना फार कमी माहिती आहे. संस्थेचे नाव अधिकाधिक लोकापर्यंत पोहोचून अधिकाधिक लोकांना त्याचा फायदा झाला पाहिजे, असे संस्थेला वाटते.

कडक उन्हात चालताना एखाद्या वटवृक्षाच्या सावलीचा जसा वाटसरूला आधार वाटावा तसेच समाजातील गोरगरीब लोकांना या संस्थेबद्दल वाटते. ही निव्वळ एक संस्था नसून अनेकांना जीवनदान देणारी जीवनदात्री आहे.



## Covid-19 Package

कोविड- १९ आय.जी.जी., एल.डी.एच., डी-डायमर, हिमोग्राम, इ.एस.आर, सी.आर.पी., फेरिटींन, चेस्ट एक्स-रे ₹ **2500**



| R-T P.C.R. Test ₹ 400 | X-Ray (Single Side) ₹ 200 | ECG ₹ 150 |
|---|---|---|

## 30+ Package

हिमोग्राम, लिवर फंक्शन, किडनी फंक्शन, ब्लड शुगर, फास्टींग व पी.पी., युरिन रुटीन, लिपिड प्रोफाइल, थॉयराइड फंक्शन टेस्ट, वटामिन बी १२,

46 पॅरामिटर ₹ **1800**

## 40+ Package

हिमोग्राम, लिवर फंक्शन, किडनी फंक्शन, ब्लड शुगर फास्टींग व पी.पी., युरिन रुटीन, लिपिड प्रोफाइल, थॉयराइड फंक्शन टेस्ट, विटामिन बी१२, एच बी ए १ सी, विटामिन डी ३

48 पॅरामिटर ₹ **3300**

## Women's Package

हिमोग्राम, युरिन रुटीन, थॉयराइड फंक्शन टेस्ट, विटामिन बी१२, एच बी ए १ सी, विटामिन डी ३ फेरीटींन, ए.एस.ओ. इ.एस.आर, प्रोलॅक्टीन, कॅलशियम, सी.आर.पी., आर.ए. फॅक्टर

39 पॅरामिटर ₹ **3500**

## Full Body Check-up Senior Citizen

हिमोग्राम, किडनी फंक्शन, युरिन रुटीन लिपिड प्रोफाइल, सी.आर.पी. आर. ए. फॅक्टर, HbA1c

43 पॅरामिटर ₹ **1500**

## Full Body Check-up Premium

हिमोग्राम, लिवर फंक्शन, किडनी फंक्शन, ब्लड शुगरफास्टींग व पी.पी. यूरिन रुटीन, लिपिड प्रोफाइल

43 पॅरामिटर ₹ **1200**

## Full Body Check-up

हिमोग्राम, इ.एस.आर रिनल फंक्शन टेस्ट, युरिन रूटिन

29 पॅरामिटर

₹ **500**

| TEST | PRICE | TEST | PRICE |
|---|---|---|---|
| Glucose | ₹ 25 | PRL | ₹ 700 |
| Urea | ₹ 60 | Blood Group | ₹ 50 |
| Creatinine | ₹ 150 | RA | ₹ 200 |
| Uric Acid | ₹ 150 | CRP | ₹ 450 |
| T-Bilirubin | ₹ 100 | ASO | ₹ 190 |
| D-Bilirubin | ₹ 100 | HBsAg | ₹ 200 |
| AlkP04 | ₹ 150 | HCV | ₹ 300 |
| T-Pro | ₹ 150 | HIV | ₹ 350 |
| Albumin | ₹ 150 | Widal | ₹ 100 |
| Calcium | ₹ 150 | Urine-R | ₹ 80 |
| Phosphorus | ₹ 150 | Stool-R | ₹ 150 |
| Ultra TSH | ₹ 200 | Chikungunya | ₹ 800 |
| Vitamin B12 | ₹ 500 | Dengue with NS1 | ₹ 450 |
| Vitamin D | ₹ 1200 | Rapid MP | ₹ 300 |
| LH | ₹ 480 | CBC | ₹ 100 |
| FSH | ₹ 480 | ESR | ₹ 40 |

| | |
|---|---|
| Kidney Function Test | ₹ 300 |
| Liver Function Test | ₹ 300 |
| Thyroid Function Test | ₹ 280 |
| Lipid Profile | ₹ 300 |
| HbA1c | ₹ 280 |
| Homeopathy | ₹ 150 |

*For course of 15 days with medicines (Conditions Apply)*

# वृत्तपत्रप्रसिद्धी



श्री गौतम मुनि मेडिकल एंड चैरिटेबल ट्रस्ट में सोनोग्राफी मशीन का लोकार्पण विधायक माधुरी मिसाल के हाथों किया गया. यहां संबंधित संस्था के आयोजक व अन्य पदाधिकारी उपस्थित थे.

## मानवता की सेवा में जैन समाज अग्रणी

### सोनोग्राफी मशीन के लोकार्पण समारोह में विधायक माधुरी मिसाल ने कहा

अरण्येश्वर, 22 जून (आ.प्र.)

'दान-धर्म तथा मानवता की सेवा के कार्य में जैन समाज अग्रणी है.' इन शब्दों के साथ विधायक माधुरी मिसाल ने जैन समाज की प्रशंसा की. वे अरण्येश्वर स्थित श्री गुरु गौतम मुनि मेडिकल एंड चैरिटेबल सेंटर में आयोजित सोनोग्राफी मशीन के लोकार्पण समारोह को संबोधित कर रही थीं.

जून 2014 में शुरू किए गए इस सेंटर में 8 डायलिसिस मशीनें हैं व अब तक करीब 35 हजार मरीज लाभान्वित हो चुके हैं. यहां मामूली दर पर या जिनकी आर्थिक स्थिति अच्छी नहीं है, उनका डायलिसिस निःशुल्क किया जाता है. इसके अलावा डेंटल, एक्स-रे, ईसीजी व रक्तजांच जैसे टेस्ट भी किए जाते हैं. संस्था के अध्यक्ष ललित जैन ने बताया कि कुछ ही दिनों में यहां सीटी स्कैन मशीन भी लगाई जाएगी.

लोकार्पण समारोह में नगरसेवक महेश वाबले, हरीश परदेशी, संस्था के मार्गदर्शक सतीश बनवट, मनोज छाजेड़, प्रफुल्ल कोठारी, मीतेश कोठारी, भरत सुराणा, प्रकाश संचेती, दिनेश कर्णावट, जीवन बेद, महेंद्र व्यास, राहुल भोगावत एवं अन्य कार्यकर्ता उपस्थित थे. कार्यक्रम का संजोजन संस्था के गौतम गेलड़ा, संतोष भुरट, दिनेश मुनोत, मुकुल बर्मेचा, वैभव सेठिया व नेमीचंद सोलंकी ने किया.

खबरें संक्षेप में



रुपम अस्थाना (लिबर्टी जनरल इंश्योरेंस के सीईओ और निदेशक)

## मानवसेवा हीच ईश्वरसेवा

### श्री गुरू गौतम मुनीजी यांचे मत

पुणे : प्रतिनिधी

समाजात गरजूंची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. योग्य व्यक्तींना मदत करा आणि मानवसेवेला प्राधान्य द्या, कारण हीच खरी ईश्वरसेवा असल्याचे प्रतिपादन श्री गुरू गौतम मुनी यांनी व्यक्त केले.

श्री गुरू गौतम मुनी मेडिकल अँण्ड चॅरिटेबल सेंटर या संस्थेच्या वतीने जगातील सर्वात प्रगत आठ डायलेसिस मशिनचे सेंटर पद्मावती येथे सुरू करण्यात आले आहे, त्याच्या उद्घाटनप्रसंगी गौतम मुनीजी बोलत होते. याप्रसंगी म.सा.प.पू. वैभव मुनीजी, संस्थेचे अध्यक्ष गणेश ओसवाल, सतीश बनवट, गौतम गेल्डा, ललित जैन, सत्यनारायण भट्टड, रमेश गुगळे, लक्ष्मीकांत खाबिया, वैभव सेटिया, मुकुल ब्रमेचा, डॉ. चारुदत्त म्हैसकर, अनिल नहार, डॉ. राकेश देव, संदीप लुंकड यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

गौतम मुनीजी म्हणाले की, समाजातील गरजूंना मोफत डायलेसिसची सेवा देण्यात येणार आहे. याठिकाणी किडनीच्या सर्व समस्यांवर उपचार करण्यात येणार आहेत. रुग्णांसाठी महागडे असलेले डायलेसिस रुग्णांना दर आठ दिवसांनी घ्यावे लागते. त्यामुळे खर्चापोटी अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत.

तर अनेकांना उपचार घेण्यासाठी पैसे नसल्यामुळे आत्महत्या करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे या संस्थेने मानवसेवा हीच ईश्वरसेवा मानून डायलेसिस सेंटर सुरू केले आहे, असे सांगून मुनीजी म्हणाले की, एका मशिनवर दिवसाला फक्त तीनच रुग्णांवर उपचार होऊ शकतात.

२० मे २०२१

## महाराष्ट्र जैन वार्ता

## 'श्री गुरू गौतम मुनी'तर्फे ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर सुविधा

### ५० ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटरच्या माध्यमातून २०० रुग्णांना जीवनदान

पुणे : संकेत डुंगरवाल
महाराष्ट्र जैन वार्ता न्यूज नेटवर्क

कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे अनेकांना ऑक्सिजनची कमतरता भासत होती. त्यामुळे दीड महिन्याच्या काळात जवळपास २०० रुग्णांना ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर पोहचवण्याचे काम श्री गुरु गौतम मुनी मेडिकल अँड चॅरिटेबल ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे. ५० ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटरच्या माध्यमातून ऑक्सिजन पुरवण्याचे काम सुरू आहे. यामुळे अनेक रुग्णांना जीवनदान मिळाले आहे.



संस्थापक सतीष बनवट, अध्यक्ष ललित जैन, केशव दिघे, नुतून गुपचुप, संतोष भुरट, वैभव सेटिया, नेमीचंद सोलंकी, दिनेश मुनोत या सर्वांनी ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर पोहच करण्यापासून विविध प्रकारची मदत केली.

नेमीचंद सोळंकी आणि संतोष भुरट यांनी हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी सर्वतोपरी जबाबदारी स्वीकारून, मशिन रुग्णांपर्यंत पोहोचवणे, रुग्णांना माहिती देणे, जास्तीत जास्त रुग्णांना या ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर मशिनचा फायदा कसा पोहोचेल, याबाबत नियोजन केले आहे.

ट्रस्टचा उपक्रम पाहून चीनमधील एका कंपनीने दहा ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर भेट दिले. यामध्ये शासनाने कस्टम ड्यूटी आणि जीएसटी माफ केले, तसेच या मशिन तातडीने भारतात येण्यासाठी शासनाची मोठी मदत झाली.
– सतीश बनवट, संस्थापक श्री गुरु गौतम मुनी मेडिकल अँड चॅरिटेबल ट्रस्ट

शहरातील अनेक रुग्णांना मध्यरात्री ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर देण्यासाठी जावे लागते. चार वर्षांच्या भुवन म्हेत्रे याला तावडतोब मशिन देण्यात आले, तसेच ट्रस्टच्या माध्यमातून मागील वर्षभरात दोन लाख जेवणाची पाकिटे वाटली आहेत.
– ललित जैन, अध्यक्ष श्री गुरू गौतम मुनी मेडिकल अँड चॅरिटेबल ट्रस्ट

# भविष्यातील योजना

## आधुनिक राजवैद्य योजनेद्वारे मिळणार प्रत्येकाला आरोग्य कवच!

पूर्वी राजे-महाराजे यांच्या घरी राजवैद्याची नेमणूक केली जायची. राज्याचा प्रमुख म्हणजे राजा. तोच आजारी पडला, तर राज्याची व्यवस्था कोलमडून पडेल. त्यामुळं राज्याचा कर्ता-धर्ता राजा आजारी पडू नये यादृष्टीनं राजाच्या तब्येतीची सर्वतोपरी काळजी घेण्याची जबाबदारी 'राजवैद्या'ची असे. पारंपरिक पद्धतीची हीच राजवैद्य ही संकल्पना आधुनिक काळात नव्यानं रुजवण्याचा 'गुरू गौतम मुनी मेडिकल ॲण्ड चॅरिटेबल सेंटर'चा प्रयत्न आहे.

'आधुनिक राजवैद्य योजना' या संकल्पनेवर सध्या काम सुरू असून कुठलाही माणूस आजारी पडू नये, त्यासाठी कोणकोणत्या गोष्टींचं 'आरोग्य कवच' त्याला बहाल करता येईल, यादृष्टीनं आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळी काम करत आहेत. योग, ध्यानधारणा, आहार-विहार, व्यायाम, दैनंदिनीला पूरक ठरेल अशी जीवनशैली आणि पूरक अशी औषधयोजना आदी गोष्टींवर काम सुरू असून लवकरच ही संकल्पना समाजासमोर सादर करण्यात येणार आहे. अनेक मंडळी कित्येक वर्षं आपल्या क्षेत्रात महत्त्वाचं योगदान देत असतात. पण उतारवयात तब्येतीच्या कारणामुळं त्यांची क्रयशक्ती आणि विचारशक्तीचा उपयोग समाजाला होत नाही. तसंच विविध व्याधींनी ग्रस्त असल्यामुळं त्यांनाही दुर्दैवानं औषधांच्या आधारे जीवन व्यतीत करावं लागतं. समाजाला त्यांचं मार्गदर्शन शेवटपर्यंत मिळावं आणि त्यांनाही आनंदानं जीवन व्यतीत करता यावं, यासाठी ही पारंपरिक संकल्पना प्रत्यक्षात आणण्याचा निर्धार संस्थेनं केला आहे.

## विश्वस्त मंडळ

**सतीश बनवट** – संस्थापक
**ललित शिंगवी(जैन)** – अध्यक्ष
**संतोष भुरट** – सचिव
**दिनेश मुनोत** – खजिनदार

गौतम गेलडा । मुकुल बरमेचा । शार्दूल गुपचूप । अनिल नहार
सौ. आरती शिंगवी (जैन) । सौ. नूतन गुपचूप । नेमिचंद सोलंकी
वैभव सेठिया । हेमंत भंडारी । मनोज छाजेड । प्रकाश संचेती
अशोक लोढा । राजेश ललवाणी । जीवन बेद

